**प्रेसनोट दि.०६/०३/२०१९**

**तडीपार इसमावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे कारवाई केलेबाबत**

दि.०४/०३/२०१९ रोजी ००.०० ते ०३.३० वा चे दरम्यान कोथरूड पोलीस ठाणे हद्दीत सुतारदरा झोपडपट्टी भागात कोंबींग ऑपरेशन राबविले. नमूद कोबींग ऑपरेशन दरम्यान रेकॉर्डवरील २२ गुन्हेगार चेक केले. नमूद गुन्हेगार चेक करीत असताना कोथरूड पोलीस ठाणेकडील रेकॉर्डवरील गुन्हेगार व मा पोलीस उप - आयुक्त सो।, परि. ०३, पुणे शहर यांनी त्यांचेकडील तडीपार आदेश क्र. ०७/२०१८ अन्वये दि. ०४/१२/२०१८ पासुन पुणे शहरातून १ वर्षाकरीता तडीपार केलेला आरोपी नामे समिर अशोक ढोकळे वय २३, रा.क्रांतीसेना कमानीजवळ, सुतारदरा, कोथरूड पुणे हा नमूद ठिकाणी मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्यांचे विरूध्द कोथरूड पोलीस ठाणे गु र नं ७२/२०१९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यास दाखल गुन्हयात अटक करून मा न्यायालयात हजर केले आहे.

अशा प्रकारे मा पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ पुणे व मा सहा पोलीस आयुक्त कोथरूड विभाग पुणे यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली पोनि खटके, गुन्हे, ३ पोलीस निरीक्षक व १५ कर्मचारी सर्व नेमणूक कोथरूड पोलीस ठाणे यांनी उत्तम कार्यवाही केलेली आहे.

(प्रतिभा जोशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोथरूड पोलीस ठाणे पुणे